| MHST160009012012 | नि.दि.मु.क्र.३०३/२०१२ मधील नि.१५३ वरील आदेश<br><br>(श्री.राजेंद्र बबन काकडे<br>वि.<br>श्री.उमेश बबन काकडे)<br><br>(पारित दिनांक १२.०७.२०२४) |
|---|---|

वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ मंगल विजय सावंत हया मयत झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे असे म्हणणे आहे की, वादींनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटपाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत हया दिनांक ३०.०७.२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांचे वारस दाव्याचेकामी रेकॉर्डवर घेणे जरुरीचे आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी दावा निशाणी १ मधील नमूद प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत या नावास काट देवून त्यापुढे मयत लिहून त्यांचे वारस हे रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात यावी. मयत प्रतिवादी क्र.४ हिचे पती पूर्वीच मयत आहेत. सबब प्रतिवादी क्र.४ चे वारस म्हणून सदरचे अर्जात नमूद प्रतिवादी क्र.४अ मुलगा व प्रतिवादी क्र.४ब मुलगी यांची नावे सामील करणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच, प्रतिवादी क्र.४ब ही १७ वर्षाची असून ती अज्ञान आहे, त्यामुळे तिचा भाउ प्रतिवादी क्र.४अ याचेवर तीची संपूर्ण जबाबदारी असल्या कारणाने अ.पा.क. म्हणून प्रतिवादी क्र.४अ हाच पालक आहे. सबब वादींनी अर्जात नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेकामी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी नं.१० यांना सदरचा अर्ज मान्य व कबूल नाही. प्रतिवादी नं.४ब यांचे करीता पालनकर्ता या नात्याने नेमणूक करण्याकरीता कायदेशीर तरतुदी प्रमाणे वादी यांनी मे.कोर्टाची

परवानगी घेणे आवश्यक व जरूरीचे आहे. या कारणाने वादी यांचा सदरचा अर्ज कायदयाने चालणार नाही. या कारणाने सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. त्यांचे पुढे असे कथन आहे की, दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास सदरची दुरूस्ती कशी आवश्यक आहे हे त्यांनी सदर अर्जात नमूद केले नाही. सबब सदरचा अर्ज खर्चासह नाकारण्याबाबत प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज व प्रतिवादींचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटपाकरीता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत हया दिनांक ३०.०७.२०२२ रोजी क्षेत्रमाहुली, सातारा, येथे मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत नि.क्र.१३९ वर दाखल आहे. तसेच वादींना मयत प्रतिवादींचे वारसांविरुद्ध दावा चालविण्याचा अधिकार आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज (नि.क्र.१५३) मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी १४ दिवसांचे आत दुरुस्ती करून दुरुस्त प्रत पुढील तारखेस दाखल करावी.

ठिकाण - वाई. **(एस. एस. कुलकर्णी)**

दिनांक - १२.०७.२०२४. चौथे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.